# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 13/03/2023 (सोमवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा चिचभवन सनि इन्फ्रा कंपनी येथे दिनांक १२/०३/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक १२/०३/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– आनंद नामदेवराव डोईफोडे, वय ४६ वर्ष, रा. ६६ उदय नगर नविन सुभेदार ले आउट जवळ नागपुर हा गेल्या ०१ वर्षा पासुन सन्नी इंफ्रा इंजिनियर प्रायव्हेट लिमीटेड मौजा चिचभवन ता. कळमेश्वर जि. नागपुर येथे प्लांट हेड पदावर कामाला असुन कंपनीमध्ये हेवी स्टिल स्ट्रॅक्चर फेब्रिकेशन होत असुन वरील कंपनी २० एकर जागे मध्ये आहे. सदर कंपनीमध्ये स्टील प्लेट कापल्यानंतर उर्वरित मुद्देमाल हा कंपनीच्या बाहेरच्या परीसरात मोकळया जागेत ठेवत होते मागिल १ महीन्यापासुन स्टीलचा कापलेला मुद्देमाल चोरीस जात असुन घटना तारखेला यातील फिर्यादीने कंपनीत जावुन चोरीस गेलेल्या मुद्देमालाची पाहणी केली असता अंदाजे अडीच ते तीन टन किंमती अंदाजे ७५०००/–रू. ते ८०,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोउपनि पाली मो क्र ९०११०३८६७७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर कोंढाळी धुरखेडा रोड येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे १६.०० वा. ते दिनांक १०/०३/२०२३ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– निलम मुरलीधर देवताळे, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०५ कोंढाळी ह. मु. शिवशक्ती नगर वाडी यांच्या शेतातील खुल्या जागेत उभा असलेला स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच .४० एल.६८७६ व बैलबंडीचा एक चाक फिर्यादी यांनी त्यांच्या शेतात जावुन बघीतले असता दिसून आले नाही. फिर्यादी यांच्या शेतात उभे असलेल्या बैलगाडीचा एक लोखंडी चाक अंदाजे किंमती अंदाजे २०००/– रू तसेच ट्रॅक्टरला लागलेली एक्साइड कंपनीची बॅटरी अंदाजे किंमती अंदाजे ३०००/– रू असा एकुण किंमती अंदाजे ५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दारासिंग राठोड ब. नं. २०४८ मो. नं. ९८६०४२७९०२ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर